शोध पत्र- अर्थशास्त्र विभाग

Dec.-09—Jan.-2010

# सीमांत शेतकरी व शेतमजुरांच्या घराची मालकी व स्वरूपातील बदल-बोदवड तालुक्याचा क्षेत्रिय अभ्यास

* डॉ. सुरेश भास्कर ढाके

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला वाणिज्य व कॉम्प्यूटर ॲपलीकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे

बोदवड तालुका हा जळगांव जिल्ह्यातील मागासलेला तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात सिंचनाच्या सुविधा खूपच कमी प्रमाणात उपलब्ध आहे. सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांकडे जमीनीचे प्रमाण कमी आहे. या जमिनीतून बारमाही रोजगार मिळत नाही. शेतीचा हंगामाचा काळ वगळता वर्षाचे बाकी दिवस बेकार रहावे लागते. परिणामी सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना मिळणारे उत्पन्न अत्यल्प असते. उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवारा ह्या प्राथमिक गरजा सुध्दा पूर्णपणे भागविल्या जात नाही. सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांचे घर कसे आहे यावरून त्या कुटुंबांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते. बोदवड तालुक्यातील सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांकडे १९९१ ते २००३ या कालावधीत असलेल्या घरांच्या संख्येत वाढ झाली आहे. प्रस्तुत शोध निबंधात निवाऱ्याच्या स्थितीतील बदल जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती :-** बोदवड तालुक्यातील एकूण ५१ गावांपैकी १० गावांची क्षेत्रिय संशोधनासाठी यादृच्छिक (Random) नमूना निवड पध्दतीने निवड केली. क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या १० गावातून प्रत्येकी १० (प्रत्येक गटाकरीता ५) असे एकुण १०० शेतमजूर कुटूंबांची यादृच्छिक पध्दतीने नमुना म्हणून निवड केली. प्रस्तुत शोध निबंधातील बहुतांशी माहिती प्रश्नावलीच्या आधारे गोळा करण्यात आलेली असून अशा माहितीला व आकडेवारीला प्रश्नावलीचा आधार आहे. निरनिराळ्या शेतकी कार्यासाठी ज्यांची श्रमशक्ती कायमची किंवा तात्पुरत्या काळापुरती मजुरीवर कामासाठी घेतली जाते, अशा व्यक्तींचा वर्ग म्हणजे शेतमजुरांचा वर्ग होय. शेतमजुरांच्या स्वतःच्या मालकीची काही जमीन असू शकते. यावरून काही जमीन असणाऱ्या शेतमजुरांचे पुढील दोन प्रकार पडतात.

१) ज्या शेतमजुरांजवळ स्वतःच्या मालकीची थोडी जमीन असते. पण त्या जमीनीपासून मिळणारे उत्पन्न उपजिविकेसाठी पुरेसे नसते, असे जे शेतमजूर अन्य व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीवर काम करतात त्यांना सीमांत शेतकरी असे म्हणतात. २) ज्यांच्याजवळ किफायतशीर जमीन असते, पण ज्यांच्या कुटुंबातील एक किंवा अनेक व्यक्ती जमीन मालकांच्या शेतावर काम करीत असतात असे शेतमजूर यांना शेतमजूर असे म्हणतात. या दोन गटाच्या अभ्यासासाठी १९९१ ते २००३ या कालखंडाची निवड केली आहे. या दोनही गटांच्या मुलाखती घेण्याकरीता प्रश्नावली तयार करून मुलाखत तंत्राने प्रत्यक्ष जाऊन भरून घेतली प्रश्नावलीतुन मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे,

**घराच्या मालकीचे स्वरूप :-**भारतात घरांच्या मालकीचे प्रमाण खुप जास्त आहेत. घरांचे अनेक प्रकार असून पक्के घर, कच्चे घर असे त्यांचे प्रकार आहे. ग्रामीण भागातील जवळपास ५३% घरे कच्ची आहेत. ओरिसा, बिहार, मध्य प्रदेश आणि कर्नाटक मध्ये कच्च्या घरांचे प्रमाण खुप जास्त आहे. तर पंजाब, तामिळनाडू, केरळ, गुजरात या राज्यात कच्च्या घरांचे प्रमाण खुप कमी आहे. ग्रामीण भागात स्वतःच्या मालकीचे घर असण्याचे प्रमाण जास्त असल्याचे कारण ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतरीत होण्याचे प्रमाण कमी असते. तसेच ग्रामीण भागात भाडयाने घरे देण्यासाठी कमी असतात. भारताचा मानवी विकास अहवाल १९९९ च्या आकडेवारीवरून भारतात ९५.५% लोकांच्या मालकीची घरे आहेत. महाराष्ट्रात हेच प्रमाण ९२.९% आहे. हरियाणा राज्यात हे प्रमाण ९९.३% इतके सर्वाधिक आहे. एकूण मालकीच्या घरांपैकी अखिल भारतीय पातळीवर ५५.४% घरे कच्ची आहेत, तर महाराष्ट्रात हे प्रमाण ५५.७% आहे. शेतमजुरांना आपल्या स्वतःच्या मालकीचे घर असावे असे एक स्वप्न असते. परंतु त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे प्रत्येकाला ते शक्य होत नाही. बोदवड तालुक्यातील सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी स्वतःच्या मालकीचे घर असणाऱ्या कुटुंबांचे विवरण खालील तक्त्यात केलेले आहे.

**स्वतःच्या मालकीची घर असणारी सीमांत शेतकरी व शेतमजुर कुटुंबे**

| | वर्ष | सीमांत शेतकरी | शेतमजूर | एकुण |
|---|---|---|---|---|
| | १९९१ | ४२ | ४७ | ८९ |
| | २००३ | ४२ | ४८ | ९० |
| स्वतः खरेदी | १९९१ | ३९ | ४७ | ८६ |
| | २००३ | - | १ | ०१ |
| सरकारकडून मिळालेले | १९९१ | ३ | -- | ०३ |
| | २००३ | १ | -- | ०१ |

**(आधार - प्रश्नावलीवरून पूर्ण)**

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, पाहणी केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी १९९१ मध्ये ८९ कुटुंबांकडे राहण्यासाठी स्वतःच्या मालकीची घरे होती, तर २००३ मध्ये ९० कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची घरे होती. १९९१ मध्ये ८९ कुटुंबांपैकी ८६ सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांनी आपआपली घरे स्वतः विकत घेतली होती. तर उर्वरीत ३ सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना सरकारकडून **बेघराना घर** या योजनेअंतर्गत घरे मिळाली होती. तर २००३ मध्ये एकूण ९० कुटुंबांपैकी १ कुटुंबाला सरकारकडून **बेघरांना घर** या योजनेअंतर्गत घर मिळाले होते. एकंदरीत १९९१ ते २००३ या कालावधीत स्वतःच्या मालकीचे घर असलेल्याचे प्रमाण किंचीत वाढले असल्याचे निदर्शनास आले.

**निवाऱ्याचे स्वरूप :-** सीमांत शेतकरी व शेतमजुरांची आर्थिक स्थिती जेमतेम असते. आर्थिक स्थिती हलाखीची असल्यामुळे हवे तसे घर बांधणे शक्य होत नाही. घराचे स्वरूप कसे आहे यावर त्या कुटुंबांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते. साधारणतः घर पक्के बांधलेले असेल तर त्या कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली आहे असे म्हटले जाते. बोदवड तालुक्यातील क्षेत्रिय संशोधनासाठी निवडलेल्या सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांच्या घरांचे स्वरूप कसे आहे याची स्थिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

**वरील माहितीच्या आधारे हे लक्षात येते की,**

१) क्षेत्रिय संशोधनासाठी निवडलेल्या १०० शेतमजूर कुटुंबांपैकी कुडांच्या भिंती व पत्र्याचे छत असलेल्या घरांची संख्या १९९१ मध्ये २५ होती ही संख्या २००३ मध्ये स्थिर आहे. २) १९९१ मध्ये दगडमातीच्या भिंती व पत्र्याचे छत असलेल्या घरांची संख्या ५८ होती, तर २००३ मध्ये ही संख्या ५९ पर्यंत वाढलेली आहे. ३) १९९१ मध्ये चुन्याच्या भिंती व पत्र्यांचे छत असलेल्या घरांची संख्या ४ होती, ही संख्या २००३ मध्ये स्थिर आहे. ४) प्रत्यक्ष पाहणी केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी १९९१ मध्ये पक्के सिमेंट कॉंक्रीटचे घर असलेल्या कुटुंबांची संख्या २ होती, तर २००३ मध्ये ही संख्या स्थिर आहे. ५) १९९१ मध्ये घर नसलेल्या कुटुंबांची संख्या ११ एवढी होती, तर २००३ मध्ये ही संख्या १० पर्यंत घटलेली आहे. एकंदरीत १९९१ ते २००३ या कालावधीत सीमांत शेतकरी कुटुंबांच्या घराबाबतच्या स्थितीत बदल झाला नाही. परंतु शेतमजूर कुटुंबातील दगडमातीच्या भिंती व पत्र्यांचे छत असलेल्या कुटुंबांच्या संख्येत किंचीत वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच शेतमजूर कुटुंबातील घर नसलेल्यांची संख्या किंचीत कमी झाल्याचे निदर्शनास आले.

**सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांच्या घरांचे स्वरूप**

| | सीमांत शेतकरी | | शेतमजूर | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९१ | २००३ | १९९१ | २००३ | १९९१ | २००३ |
| १) कुडांच्या भिंती व पत्र्याचे छत | १४ | १४ | ११ | ११ | २५ (२५%) | २५ (२५%) |
| २) दगडमातीच्या भिंती व पत्र्यांचे छत | २५ | २५ | ३३ | ३४ | ५८ (५८%) | ५९ (५९%) |
| ३) चुन्याच्या भिंती व पत्र्याचे छत | ३ | ३ | १ | १ | ४ (४%) | ४ (४%) |
| ४) पक्के सिमेंट कॉंक्रीट | - | - | २ | २ | २ (२%) | २ (२%) |
| ५) घर नसलेले | ८ | ८ | ३ | २ | ११ (११%) | १० (१०%) |
| | ५० | ५० | ५० | ५० | १०० | १०० |

**सूची - शेकडा प्रमाण निवडलेल्या १०० शेतमजूर कुटुंबांची आहे. (आधार - प्रश्नावलीवरून पूर्ण)**

**विजेच्या घरगुती वापराचे प्रमाण :-**विजेचा वापर करणे हे प्रगतीचे प्रतिक समजले जाते. विजेचा वापर जेवढा जास्त तेवढी आर्थिक प्रगती झाली असे म्हटले जाते. सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील एकूण कुटुंबांपैकी विजेचा वापर करणाऱ्या कुटुंबांची स्थिती पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

**विजेचा घरगुती वापर करणारी सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबे**

| | सीमांत शेतकरी | शेतमजूर | एकुण |
|---|---|---|---|
| १९९१ | २२ (४४) | ३६ (७२) | ५८ (५८%) |
| २००३ | २९ (५८) | ४७ (९४) | ७६ (७६%) |

(कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात.) (आधार-प्रश्नावलीवरून पुर्ण)

**वरील माहितीच्या आधारे असे स्पष्ट होते की,**

क्षेत्रिय संशोधनासाठी पाहणी केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी १९९१ मध्ये ५८(५८%) कुटुंबे विजेचा वापर घरामध्ये करीत होते, तर २००३ मध्ये विजेचा घरगुती वापर करणाऱ्या कुटुंबांच्या संख्येत वाढ होवून ती ७६(७६%) इतकी झाली असल्याचे दिसून आले आहे.

**घरगुती वीज कनेक्शनची मालकी :-** सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील एकूण कुटुंबांपैकी विजेचे कनेक्शन स्वतःच्या

मालकीबाबतचे विवरण पुढील तक्त्यात दिले आहे.

**वीज कनेक्शन स्वतःच्या मालकीची असणारी सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबे**

| | सीमांत शेतकरी | शेतमजूर | एकूण |
|---|---|---|---|
| १९९१ | २२ (४४) | २८ (५६) | ५० (५०%) |
| २००३ | २९ (५८) | ३७ (७४) | ६६ (६६%) |

(कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात.) (आधार-प्रश्नावलीवरून पूर्ण)

वरील माहितीवरून असे स्पष्ट होते की,

क्षेत्रिय संशोधनासाठी पाहणी केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी १९९१ मध्ये ५०(५०%) कुटुंबांच्या विज कनेक्शन स्वतःच्या मालकीची होती तर उर्वरित कुटुंबे दुसऱ्याच्या घरातून वीज वापरायला घेत असत. तर २००३ मध्ये या प्रमाणात वाढ होवून ६६(६६%) कुटुंबाच्या वीज कनेक्शन स्वतःच्या मालकीचे होते तर उर्वरित कुटुंबे दुसऱ्याच्या घरातून भाडयाने वीज वापरायला घेत असत.

**निष्कर्ष :-** १) पाहणी केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी १९९१ ते २००३ या कालावधीत स्वतःच्या मालकीचे घर असलेल्याचे प्रमाण किंचीत वाढले असल्याचे निदर्शनास आले. सीमांत शेतकरी कुटुंबांपैकी ४ कुटुंबाला **बेघरांना घर** या सरकारच्या योजनेअंतर्गत सरकारकडून घरे मिळाले असल्याचे दिसून आले. २) १९९१ ते २००३ या कालावधीत सीमांत शेतकरी कुटुंबांच्या घराबाबतच्या स्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचे निदर्शनास आहे. परंतु शेतमजूर कुटुंबातील घर नसलेल्या कुटुंबांची संख्या कमी झाल्याचे निदर्शनास आले.३) पाहणी केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी १९९१ ते २००३ या कालावधीत विजेचा घरगुती वापर करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जास्त वाढले असल्याचे निदर्शनास आले. ४) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या १०० सीमांत शेतकरी व शेतमजूर कुटुंबांपैकी घरगुती वीजेचे कनेक्शन स्वतःच्या मालकीचे असल्याचे प्रमाण १९९१ ते २००३ या कालावधीत वाढले असल्याचे दिसून आले. तरीही वीज कनेक्शन सवतःच्या मालकीचे नसणाऱ्यांचे प्रमाण आजही जास्त असल्याचे निंरादर्शनास आले.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) सामाजिक संशोधन पध्दती डॉ. भांडारकर पु.ल.
२) श्रमाचे अर्थशास्त्र डॉ. प्रभाकर देशमुख
३) कृषी अर्थशास्त्र डॉ. विजय कविमंडन
४) भारताचा मानवी विकास अहवाल अबू सालेह शरिक १९९९ - पान नं. ५३,५९५) प्रश्नावली